मच्छिंद्रनाथ माळी



# घबाड

# घबाड

मच्छिंद्रनाथ माळी

# घबाड (Ghabaad)

कथा

लेखक : मच्छिंद्रनाथ माळी
शिवकृपा निवास. कोमलनगर, पडेगांव , औरंगाबाद.
Email :-   mali.machhindranath@gmail.com
Ph : 91-9823615747

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून
पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर
करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Teen Hath Naka, Thane

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या कथांतील

सर्व पात्रे,

प्रसंग आणि स्थळे

पूर्णतः काल्पनिक आहेत.

कोणाही व्यक्तीशी व प्रत्यक्ष घटनेशी साधर्म्य आढळल्यास

तो योगायोग समजावा.

अनुक्रम


घबाड

बाजिंदी

# ‘घ बा ड’

एकदाचं लग्न होऊन शालीनी सासरी नांदायला गेली अन् शालूची आई सारजाबाईचा. .मामा मामीचा असा तिघांचाही जीव एकदमच भांडयात पडला. शालु अवघी दीड वर्षाची असतांनाच दोघी मायलेकींना वाऱ्यावर सोडून राणूबा देवाघरी निघुन गेला होता. एका अशुभ संध्याकाळी राणुबा कामावरून घरी परतला तो मुळी तापानं फणफणतच. औषध पाण्याचाही ऊपयोग झाला नाही. जणु तो आजार त्याला घेऊन जाण्यासाठीच आला होता.

राणुबाच्या मरणानंतर शालुची आई व शालु मामाकडं लातुरलाच राहु लागल्या. चंद्राच्या कलेप्रमाणे वाढणाऱ्या शालुचे सगळ्यांनी जरा वाजवीपेक्षा जास्तच कोड कौतुक केले होते. सारजाबाईचा तर शालु जणु जीव की प्राण होती. ऊगीच बहिणीचं मन दुःखवायला नको म्हणून मामा पण शालुला कधी काही बोलत नसे की दापीत नसे. म्हनुन शालुला नको तितकी मोकळीक मिळाली. जेमतेम परिस्थीती असलेल्या मामानंही आपल्या कुवतीनुसार शालुला सुखात वाढवली होती.

शिक्षणात शालु विशेष हुषार नव्हती. शेजारची नलु तिची बाल मैत्रिण आणि वर्ग मैत्रिणही होती. नलुचे वडील बांधकाम खात्यात इंजिनियर होते. त्यामुळे घरात वैध अवैध मार्गानं पैशाचा नुसता ओघ लागला होता. त्यामुळे नलुला चैनबाजीसाठी पैश्यांची कधी टंचाई नसायची. 'गाडीबरोबर नरोळयाची जत्रा' या न्यायाने नलुबरोबर शालुही चैनबाजी करण्यात तसुभरही मागं नव्हती. बेहिशोबी पैशातुन दोघींचीही चैनबाजी चालायची. मात्र यामुळं शालुचा स्वभाव काहीसा विचित्र होत गेला. तिच्या मनात काहीतरी विचार चालु असत. रात्रंदिवस ती 'श्रीमंती आणि ऐश्वर्य.वैभव' पणांचीच स्वप्नं रंगविण्यात दंग असायची. 'काहीही करून आपण श्रीमंत व्हायचं'अशी जिद्द तिनं उराशी बाळगली होती. पण 'समय से पहले. भाग्य से जादा किसीको कुछ नही मिलता' हे श्रीमंतीच्या भुताने झपाटलेल्या शालुला कसं कळणार □ वाढत्या वयाबरोबर तिचं हे श्रीमंतीचं वेडही वाढतच गेलं. तिला याबाबत आधार होता तो लग्नाचा. एखादा श्रीमंत नवरा मिळेल हीच आशा होती.

पण गेल्या वैशाखात पिंपरवाडीच्या सखा म्हैसकराशी तिचं 'शुभ मंगल' झालं अन् 'चांगला पैशावाला' गठवुन श्रीमंत होण्यचं तिचं गोड गुलाबी स्वप्न पुन्हा एकदा भंग पावल्याचं दुःख तिला नाइलाजानं पचवावं लागलं. नाव म्हैसकर असलं तरी अंगणात एक दोन म्हशी बांधण्याइतका पैसेवालाही सखा नव्हता. सखाची परिस्थीती गरिबीचीच .साला महिण्यानं लोकाकडं काम करायचं .वृध्द आई वडीलही मोल मजुरी करीत. थोडा जमिनीचा तुकडा होता तोही सावकाराकडे लग्नाच्यावेळी गहाण पडला होता.

शालु सासरी नांदायला आली खरी पण तिला अगदीच चुकल्या चुकल्यागत वाटायलं. ए. सी. तला माणुस ऊन्हात गेल्यागत तिला झालं. तिच्या मनाला सारखी रूखरूख वाटत होती. तिचं मन कशातच रमत नव्हतं. तिच्या स्त्रीसुलभ मनाची दोन दागिने अंगावर घालण्याची हौस देखिल लग्नात भागली नाही म्हणुन ती खुपच खिन्न झाली होती. तिचं मन सारखं कसल्यातरी विचारात गुरफटल्यालं असायचं.

लग्न झाल्यापासून सखाचंही मन पहिल्यासारखं कामावर लागेना झालं. कामावर तो शरीरानंच जायचा. पण त्याचं मन मात्र सारखं शालुभोवती घिरटया घालायचं. कधी एकदा घरी जातो असं व्हायचं. शेतावर आज ऊसाचं रान तयार करण्याच काम चाललं होतं. सोबतच्या दोन गडयाबरोबर सखा पण वावर बांधायचं काम करीत होता. सूर्य माथ्यावर आला होता. उन्ह चांगलच तापलं होतं. उष्माही खुपच वाढला होता. विहिरीवरच्या भल्या थोरल्या झाडावर बसल्याली पाखरं खुषीत असल्यागत उगीच कुचऽऽकुच करीत बसली होती. माणसं यंत्रागत कामं करीत होती. फावडयांनी काळी भुसभुशीत माती ओढली जात होती. सखाचे हात यंत्रागत माती ओढीत होते. त्याचवेळी त्याचं मन मात्र शालुच्या विचारात गुंतलं होतं. त्याच कामात लक्षच नव्हतं. सगळयांच्या अंगातुन घामाच्या धारा निथळत होत्या अन् काळया मातीत मिसळत होत्या.

इतक्यात सखाच्या हातातलं खोरं मातीतुन सरळ त्याच्या नडगीवर आदळलं. नडगीला भली थोरली जखम झाली. रक्ताची लाल चिळकांडी काळया मातीत ऊडाली. असह्य वेदनेने सखाच्या तोंडून नकळत 'आऽऽई गं' म्हणत जोरात विव्हळला. दोघा गडयांनी त्याला कसंबसं सावरलं. त्याच्या जखमेवर फडकं आवळलं. अन् गाडीत घालून त्याला घरी अंथरूणावर आणून टाकलं. सखाची तर केव्हांच शुध्द हरपली होती.

दिवस मावळतीला गेला होता. कोवळी कोवळी पिवळीधमक ऊन्हं अंगणात पसरली होती. शालु उशाशी बसून केविलवाण्या नजरेने त्याच्याकडे पहात होती. सखानं डोळे किलकिले करून उघडले तसं शालुनं 'आता कसं वाटतं ' म्हणून त्याला विचारलं. त्याचे ओठ थरथरले. 'आता बरं वाटतं .सारं कसं क्षणात घडलं समजलच नाही.

त्यावर 'जाऊ द्या.आता चांगला आराम करा. ' असा धीर देत शालु म्हणत होती. अन् आपला हात प्रेमळपणाने त्याच्या गरम कपाळावरून फिरवत सखाला लाडीकपणानं म्हणाली 'सोडून द्या जीव घेणं काम .शहरात जाऊ. तिथं करू काहीतरी काम. शहरात कामाला काही कमी नसतं. ' अन् तिनं सखाच्या पाठीमागं शहरात चालण्याचा सारखा लकडा लावला. याचं त्याचं उदाहरण दिलं.

सखा मात्र नव्याच गोंधळात सापडला होता.

'शहरात आपण कुठ राहणार ?आपल्या माघारी आईवडीलाचं कसं होणार ?असे एक ना दोन अनेक प्रश्न त्याला भेडसावू लागले. 'इकडं आड तिकडं विहिर' अशी द्विधा अवस्था झाली होती त्याची. अखेर स्त्री हट्टापुढं सखानं हात टेकले होते. त्याला न कळता चाणाक्ष शालूनं मामाकरवी काम अन् रूम याची अगोदरच जुळवा जुळवा करून ठेवली होती. याची बिचाऱ्या भाबडया सखाला जरासुध्दा कल्पना नव्हती.

जखम बरी होताच एका सकाळीच सखाचं बिढार बैलगाडीत घातलं गेलं. अन् औरंगाबादच्या अतिशय दाटीवाटीच्या मोहल्ल्यात बोळातल्या एका खोलीत शालुनं आपला नवा 'राजा राणीचा संसार' थाटला होता. एका किराणा दुकानात सखा कामाला लागला. शालुनंही कुठलसं पॅकिंगचं काम घरच्या घरी मिळवलं होतं. संसाराचं गाडं अगदी सुरळीत चाललं होतं. तसं 'श्रीमंतपणाचं येडं खुळ' पुन्हा शालुच्या डोक्यात मुळ धरू लागलं. शेजारच्या बाळुजवळ गुपचूप दिवसाआड पैसे देउन लॉटरीचे आकडे खेळु लागली अन् मनात लक्षावधी बक्षिसाची सोनेरी स्वप्न रंगवु लागली .बाळुही तिच्या लालची स्वभावाचा फायदा घेत जमेल तशा

भुलथापा देऊन पैसे उकळीत होता. 'दुसऱ्यावर विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला' या समर्थ उक्तीनुसार बाळु बक्षिसाचे काही पैसे परस्पर खिश्यात घालु लागला.

गप्पा मारतां मारतां मागं एकदा झालेल्या दंगलीत बाळूचा बाप घराबाहेर पडल्याने कसा दंगलखोराकडून कसा मारला गेला. आईला शासकीय मदत म्हणुन बरीच मोठी रक्कम कशी मिळाली याचा साद्यंत इतिहास बाळूनं शालुला ऐकवला अन् तेव्हापासुन तर तिचं विचारचक्र मात्र जरा वेगळयाच दिशेनं फिरू लागलं होतं. दारावरून कोणी भविष्य सांगणारा बाजारू पंडीत चालला तर शालु त्याला भरपुर दक्षिणा देउन हात दाखवून त्याच्या तोंडून स्वतःचं भविष्य मोठया आतुरतेने ऐके. पण जेव्हां त्याच्या तोंडून 'अचानक धनलाभा' बद्दल शब्द निघत नसे मग मात्र ती मनात खट्टू होइ.

असंच एकदा एका कुडबुडया जोश्यानं तिला 'लवकर अचानक धनलाभ होणार' असं भाकीत तिला ऐकवलं. शालुचं मन आनंदानं मोहरून गेलं. खुष होऊन तिनं त्याला पोटभर फराळ घालून वर मोठी दक्षिणा देऊन मोठया आपुलकीनं त्याची बोळवन केली होती.

शालुचा हा उपद्व्याप कधीतरी सखाच्या कानावर पडायचा. सखा तिला प्रेमानं विश्वासात घेऊन समजावुन सांगे 'अग शालु पैसा , धन दौलत हेच काही मानवी जीवनात सर्वस्व नाही. पैशाने मानसिक , आत्मिक सुख समाधान , संतोष मिळत तर नाहीच उलट पैशाच्या हव्यासापाई मनुष्य मनाचं सुख समाधानाला हरवुन बसतो. मनुष्याला संपत्तीचा मद चढला , गर्व झाला की तो परमेश्वरापासून विन्मुख होतो. मनुष्याने त्याच्या प्रंपचाला अध्यात्मिकता आणि परमार्थाची पुष्टी दिली तर त्याचा प्रंपच सुफल संपन्न आणि सार्थ झाल्याशिवाय रहात नाही. श्री संत ज्ञानेश्वर महाराज "अवघाची संसार सुखाचा करीन , आनंदे भरीन तिही लोक" म्हणतात ते काही उगीच नाही. शालु तूही पैशाच्या चिंतेत सुखाचे दिवस वाया घालवु नकोस. ठेविले

अनंते तैसेची समाधाने रहा' असा उपदेशीक भाषेत समजावी. पण सारं पालथ्या घडयावर पाणी. नवऱ्याच्या उपदेशाचा शालुवर तीळमात्र परिणाम होत नसे. आपला हेका कायम ठेवित ती नवऱ्याला म्हणे...

'अहो सख्या सजना . जरा मागचं आठवा . तुम्ही जन्मभर दुसऱ्याच्या दारी रक्त आटवावं . उपाशी पोटी दिवस कंठावावं . ते काही नाही. काही तरी युक्ती काढा . गरिबीचा हा दुष्ट कोष फोडा . अन् पदरी धन जोडा . सुखाच्या गादीवर पडा. ' अन् मग सखाचा बायकोपुढं नाईलाज होई. तो नुसताच मुखस्तंभासारखा बसुन राही.

सखाचा बा दोन दिवसा अगोदर पोराकडे आला होता. शहरात अचानक हिंसाचार उसळला होता. हिंदु मुस्लिम समाजात तेढ निर्माण झाली होती. गल्ली बोळात भोसका भोसकीचे प्रकार घडू लागले. लोकांचे मुडदे पडू लागले. पोलीस गोळीबारात लोक बळी पडू लागले. घराबाहेर पडलेल्या लोकांचा ठाव ठिकाणा नव्हता.

सखाचा बापही दुधाची बॅग आणायला म्हणून गेला तो परतलाच नव्हता. शहरात 'कर्फ्यु ' लागला होता. सर्वत्र सामसुम झालं होतं. सगळीकडे स्मशान शांतता पसरली. थोडं वातावरण निवळल्यावर शालुच्या आग्रहाखातर त्यानं 'बाप बेपत्ता असल्याची खबर'ठाण्यात नोंदविली होती. दुसऱ्याच दिवशी पोलीसांनी

आवाहन केल्याने तो आणि शालु प्रेत ओळखायला गेले. शालूनं एका दुसऱ्याच प्रेताकडं बोट दाखवुन तेच सासऱ्याचं असल्याचं पोलीसांना सांगितलं.

प्रेत ताब्यात घेण्यासाठी ते दुसऱ्या दिवशी सकाळी गेले तर ते प्रेत दुसऱ्याच वारसदारांनी ओळख पटवुन ताब्यात घेतलं होतां. सखाला मात्र पोलीसांनी चांगलच वेठीस धरलें. ‘पैशाच्या लोभापायी खोटं सांगतोस काय रे ऽऽ □’ ‘थांब तुला गजाआडच करतो’असा रागानं सज्जड दम भरला. तसं शालुनं हवालदाराच्या हाता पाया पडत गयावया करून मोठया मिनतवारीनं नवऱ्याला सोडवलं. दोघं घरी आले.

घरी आले तर म्हातारा ओटयावर बसुन आरामात बिडीचे झुरके घेत धुराचे लोट हवेत सोडीत होता. शालू आऽऽ वासुन पहातच राहीली. ‘हे काय बाबा □दोन दिवस तुम्ही होता कुठं □’सखानं विचारलं.

तसं म्हाताऱ्यानं खुलासा करीत सांगु लागला... ‘आरंऽ बाबा दुध आणायला गेलो तर तिकडं हवा एकदम टाइट झाली. पोलीसांच्या गाडया रस्त्यावर धाउ लागल्या .जमावाच्या रोखाने पोलीसांच्या फैरी झडू लागल्या. क्षणार्धात रस्ते निर्मनुष्य झाले. मला तर काही सुचना गेलं. नाइलाजाने मी एका घरात घुसलो अन् सुदैवाने ते घर पाव्हण्याचं निघाल. मग थांबलो तिकडंच’. अन शालुच्या स्वप्नाचा पुन्हा एकदा चुराडा झाला. झाल्या प्रकाराने सखा मात्र जाम वैतागला होता.

अशातच शालुच्या आईने येऊन ठाण मांडलं. तसा लिंबाजीने म्हणजे सखाच्या बानं घरातुन काढता पाय घेतला. तो गावी परतला होता. सुट्टीचा दिवस म्हणुन सखा घरीच होता. दोघी माय लेकी सांजच्याला

गणपतीच्या दर्शनासाठी मंदिराकडे जायला निघाल्या. त्या रोडने जात होत्या इतक्यात डोळयाचे पाते लवते न लवते तोच मागून आलेल्या मारूती कारचा धक्का म्हातारीला लागला. म्हातारी रोडवर आदळली. म्हातारीचा पाय मोडला.

म्हातारीचा पाय मोडला खरा पण त्याचवेळी शालुच्या नशिबाचा नाळ धनलाभाशी देवाने जोडला. कारमधल्या दोघांनी उतरून कोणाला काही कळायच्या आत म्हातारीला आणि शालुला गाडीत घातलं अन् घाई घाईतच एका मोठया हॉस्पीटलात म्हातारीला ॲडमिट केलं. म्हातारीचा ईलाज सुरू झाला तशी त्यांनी घाईतच पॅन्टच्या खिश्यातुन नोटांच बंडल काढलं. दवाखान्याच्या काउंटरला ॲडव्हांस भरला अन् बाकीच्या नोटा न मोजताच शालुच्या हातात टेकवल्या अन् घाईने तेथुन सटकले. हे सगळं शालुला काही कळण्याच्या आतच घडलं. पण हया गडबडीत ,धावपळीत ते लोक त्यांची ब्रीफकेस म्हातारीच्या कॉटजवळ विसरून गेले. शालुनं ती गुपचूप उघडून पाहीली अन् तिचे डोळे दिपुन गेले. ती हजाराच्या नव्या करकरीत नोटांनी खच्चुन भरली होती. तिने ती ब्रीफकेस लपवली. बॅग घेण्यासाठी ते लोक कोणत्याही क्षणी येतील हया भितीने ताबडतोब म्हातारीच्या पायाचे प्लास्टर करून घेतले आणि तात्काळ म्हातारीला तेथून काढले ,अन् घरी आणले. बॅगचा शोध करीत ते लोक केव्हांही आपल्या घरापर्यंत पोहचतील हया भितीने व हाती आलेली लक्ष्मी हातची जाउ नये म्हणून दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे झुंजूमुंजू व्हायच्या आत आपलं घरसामान खोलीबाहेर काढलं अन् शेजारी पाजारी यांना काही कळण्याआधी शहर सोडलं अन् आपलं गांव गाठलं.

आता गांवी ते आनंदात राहु लागले . पण सखा शहरात जातो काय अन् दोन चार महिण्यातच ते गांवी परत येतात काय□गहाण जमिन सोडवतो काय□अशी काय 'जादु' घडली की सखाचा एकदम काळच पालटला□अशा अनेक प्रश्नांचं कोडं गांवकऱ्यांना काही केल्या ऊलगडत नव्हतं. शालु आणि सखा मात्र या बाबतीत मौन पाळुन होते.

मात्र एका दुपारच्या वेळी गावात एक कार आली. काय घडतंय हे कळायच्या आत कारमधल्या तिघांनी कोणीतरी 'हाच सखा' असल्याचं सांगितल्याने त्यांनी सखाला गाडीत घालुन नेलं त्याचा अद्यापही थांगपत्ता कोणालाही कळत नव्हता म्हणुन सारेजण हळहळत होते......

पण शालुला 'घबाड' मिळाल्याच्या आनंदानं मनोमन खुष होती. ती तिला 'सखाच्या या अपहरण नाट्या' मुळं कोणासमोर ऊघड करतां येत नव्हती. बेहोषीत सखाचा शोध कसा घ्यावा हे कळत नव्हते.

-----------x----------

...आपल्या प्रतिक्रीयेसाठी आणि कथेच्या पुढील भागासाठी संपर्क साधा... mali.machhindranath@gmail.com

-----------x----------

# “बा जिं दी”

भगतवाडीच्या शाळेचे जुने कावळे मास्तर सेवानिवृत्त होऊन नव्याने शिक्षण विभागात शिक्षक म्हणुन भगतवाडीचे शाळेवर नेमणूक झालेले नविन तरूण तडफदार शिक्षक सोपान नामेकर याचा “स्वागत समारंभ” आणि जाणारे कावळे मास्तर याचा “निरोप समारंभ” गावकऱ्यांनी एकाच दिवशी. एकाच वेळी अन् शाळेत एकाच रंगमंचावर दुहेरी कार्यक्रम आयोजित केला असल्याने ‘एकाच दगडात दोन पक्षी मारण्यातला आनंद’ सर्वजण उपभोगत होते. येणारे आणि जाणारे असे दोघेही व्यासपीठावरील आपापल्या नेमून दिलेल्या आसनावर विराजमान झालेले होते. पहिला आपल्या ‘कर्मयोगाची सांगता’ होऊन जीवनचक्राची व्दितीय परिक्रमा पुर्ण करून आयुष्याची मावळती सायंकाळ पाठीशी घेउन तिसऱ्या अन शेवटच्या परिक्रमेला सामोरे

जाण्यासाठी बाहेर पडणार होता. त्याचवेळी सोपान 'शाळेच्या यज्ञवेदीवर आपल्या कर्मयज्ञाची' नव्याने सुरूवात करण्यासाठी विद्यार्थीदशा संपवून जीवनक्रमाच्या दितीय गृहस्थाश्रमी प्रवेश करीत ज्ञानदानाचं पवित्र काम करण्यासाठी नव्या उत्साहाने कर्मयोग क्षेत्रात उतरत होता.

व्यासपीठावर बसल्याजागी सोपान नामेकरच्या डोक्यात मात्र विचारांचं काहुर उठलं होतं. डोळयापुढं अख्खा भूतकाळ साकारला होता...... सोपान भूतकाळात हरवून गेला...

....................

हीच ती शाळा. वीसेक वर्षांपुर्वीचा दिवस असेल.

नेहमीसारखा घडयाळाचा काटा बारावर आला तसं कावळे मास्तरांनी धोतराच्या सोग्यानं चेहऱ्यावरचा घाम पुशीत 'ए ऽऽ घंटा वाजवा रेऽऽ'असा मोघम हुकूम सोडला तशी चारदोन पोरं शाळेच्या कोपऱ्यात टांगलेल्या 'लोखंडी फाळाच्या घंटे'च्या दिशेला उधळली अन एकजण जोरजोरात घंटा बडउ लागला तो कावळे मास्तर ओरडल्यावरच घंटा वाजवायचा थांबला. ही शाळेची एक तासाची मधली सुट्टी. दप्तर जागेवरच सोडून मुलांचा लोंढा बाहेर पडे. बाहेर धींगामस्ती करायची. एकमेकांच्या खोडया काढायचे एक दुसऱ्याला चिडवायचे. मधल्या सुट्टीची वेळ संपली म्हणजे गुमान शाळेत परतायची. ती पाचला शाळा सुटल्याची घंटा वाजल्यावरच बाहेर पडायची.

शाळा सुटतेवेळी व सकाळी दोन्ही वेळेला मात्र घंटा सोनाराचा सांडूच वाजवायचा. सांडुही ‘वर्ग मॉनिटर’ आणि ‘शाळेचा विनपगारी अर्धवेळ चपराशी’असा महत्वपुर्ण दुहेरी पदभार ईमानेइतबारे सांभाळीत होता. दररोज सकाळी सर्वाच्या आधी शाळेत येई. झाडलोट करी. कावळे मास्तरांचं टेबल खुर्ची साफ करी .भिंतीला टांगलेला फळा पुसून ठेवी. शाळा भरण्याची वेळ झाली म्हणजे जोरजोरात घंटा वाजवायचा. घंटानाद संपुर्ण गावात घुमायचा अन सारी पोरं शाळेकडे धावायची. पंधरावीस मिनीटात शाळा भरायची. अंगात पांढराशुभ्र शर्ट. डोक्यावर कोनेबाज गांधी टोपी. लाल काठी मसरई झुळझुळीत धोतर अशा रूबाबदार पेहरावातले कावळे मास्तर उजव्या हातात धोतराचा सोगा धरून घरून यथावकाश शाळेत यायचे. शाळेत सर्व अलबेल पाहुन प्रसन्नचित्त खुर्चीत स्थानपन्न व्हायचे.

मुलांवर कावळे मास्तर भारी माया करायचे. मुलांना जीव लावुन शिकवायचे. एकदा माधव ज्युलियनांची ‘प्रेमस्वरूप आई वात्सल्यसिंधू आई ’ही कविता मुलांना तालासुरात म्हणून दाखविली अन् रसग्रहण शिकवतांना त्यांचे डोळे भरून आले. मुलांचेपण डोळे डबडबुन आले होते. सोपानच्या डोळयासमोर आजही तो प्रसंग जसाच्या तसा उभा राहिला होता.

दोन दिवसापासून कावळे मास्तर दोन महिण्याची थकलेली फी सोपानकडे मागत होते. सोपानने आई कडे पैसे मागितले पण तिच्याकडे नव्हते. तिनं सोपानला सांगितल ‘शाळा सुटल्यावर मास्तर एकटं असल्यावर सांग. तुम्हाला मपल्या आईनं घरी बोलावलं म्हुऩ’ पाचची घंटा वाजली अन साऱ्या पोरांचा घोळका बाहेर पडला अन आपापल्या घराकडे निघुन गेली. कावळे मास्तर अन सांडू दोघेच होते. बोलावं की न बोलावं ह्या विचारात तेथेच रेंगाळत होता. कावळे मास्तरांनीच त्याला विचारलं ‘का थांबलास रेऽऽ सोपान□’ त्यावर दबक्या आवाजात सोपान म्हणाला ‘तुम्हाला आईने घरी बोलावलं’. मास्तर ‘बरं ’म्हणाले तसा तो घरी आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दप्तर घेउन शाळेला निघाला तेव्हढयात सोपानच्या आईने . शेवंताने फीसाठी त्याच्या हातात वीस रूपयाची कोरी करकरीत नोट ठेवली. नोट नुसती कडकड आवाज करीत होती. साऱ्या रस्त्याने ती नोट न्याहाळीत अन इतकी नवी नोट आईकडे कशी □हाच विचार करीत पोहचला. शाळा सुरू झाली होती. त्यानं ती घडी न करता पुस्तकात ठेवली अन अभ्यासाला लागला. त्याचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. डोळयासमोर नोट नाचत होती. त्याला मोह अनावर झाला. त्यानं ती पुस्तकातून गुपचुप बाहेर काढली कितीतरी वेळ न्याहाळीत राहिला हातातल्या पेनानं नोटेवर एका कोपऱ्यात बारीक अक्षरात ‘सो. ना. ’ असं लिहीलं. मधल्या सुट्टीत नोट त्याने कावळे मास्तरच्या हाती सोपविली. नोट मास्तरकडे देतांना मनाचा मोह आवरेना झाला पण काय करणार □अन् त्याला आईच्या व स्वतःच्या गरीब परिस्थितीची तीव्रतेने जाणीव होउ लागली.

आठ नऊ वर्षाच्या सोपानला फारसं असं काही कळत नव्हतं. पण आता त्याचं मन अकाली पोक्त होउ लागलं होतं.

.......................................

दहा अकरा वर्षापुर्वी शेवंताच्या बापानं यथाशक्ती हुंडा देऊन बोरगावच्या संभा नामेकरांशी शेवंताचं लग्न लावुन दिलं होतं. शेवंता रंगारूपानं पाचपंचवीस तरूणीमध्ये उठून दिसेल अशीच होती. तिचं सळसळणारं तारूण्य त्यात मोहक सौंदर्य. पाहणारा घायाळ होउन जायचा. संभ्याला दारूचं जबरदस्त व्यसन

जडल्यालं. आईबाप, भाऊ, बहिण असा सहा माणसाचा परिवार वाढता. पैसा पुरना गेला. शेवंताचा मानसिक, शारिरीक छळ सुरू झाला. सासरचे 'माहेराउन पैसे आण' म्हणु लागले. पैसे आणायला माहेरी जात नाही म्हणून त्रास करू लागले. शेवंता मूकपणानं सहन करीत होती. नवरा दारू पिउन आला म्हणजे मारहाण करायचा. शेवंता हा जाच गरीब गाईसारखा सहन करीत होती. मनातल्या मनात जळत हेती ,लाकडासारखी वाळत होती.

बुधवार. आज बाजारचा दिवस होता. संभा सकाळीच घराबाहेर पडला तो मध्यरात्रीच्या जवळपास परतला तो भेलकांडत, झोकांडया खातच. दारूच्या नशेत तो तऽऽर्र झाला होता. शेवंताला शिव्या हासडीतच घरात शिरला. शेवंताला लाथाखाली तुडवली, बडवतच तेव्हढया अपरात्री घराबाहेर काढली. अन 'पैसे आणल्याबिगर तुला या घरात जागा नाही' असं बडबडत दार धाडकन बंद करून घेतलं. वादळात सापडलेला नावेसारखी तिची अवस्था झाली. चार महिण्याची गर्भार शेवंता कडाक्याच्या थंडीत रात्रभर दारावर पडून होती.

भल्या पहाटे कोंबडं ओरडलं. सासुनं दार उघडलं अन तिच्या झिंज्या धरून तिला उभं केलं, हंडा डोस्क्यावर ठेउन विहिरीवर पाण्याला पिटाळलं. अंधार अजुन निवळला नव्हता. शेवंता थंडीने कुडकुडत बादलीने पाणी काढत होती. संभाने नेमकी वेळ साधुन पाय न वाजवता गुपचूप पाठीमागुन जाउन तीला विहिरीत ढकलून दिली अन अंधारात पसार झाला.

शेवंता जीवाच्या आकांताने पाण्यात हातपाय मारीत होती. आयुष्य बळकट म्हणून विहीरीच्या काठाला कंगणीला धरून जीव वाचवला. प्राणावर बेतलेला प्रसंग कसाबसा निभावला. दिवस निघाला तसं गावातील दोघाचौघांनी तीला बाहेर काढली अन माहेरी पोहचवली.

माहेरी सहाव्या महिण्यातच तीनं सोपानला जन्म दिला. वर्ष उलटलं नाही तोच शेवंताचा बाप इहलोक सोडून गेला. आई तर अगोदरच स्वर्गवाशी झाली होती. भाऊभावजयांना शेवंताची ही नसता उठाठेव नकोशी झाली होती. घरात नुसत्या कटकटी सुरू झाल्या होत्या. 'इकडे आड तिकडे विहीर'अशी शेवंताची गत झाली होती. माहेरी भावाकडे निभाव लागण्याची आशा संपली. सासरी प्राणाची शाश्वती नव्हती. उभं आयुष्य राक्षसी आकाळ विकाळ रूप धारण करून तीच्यापुढं उभं ठाकलं होतं. ईवल्याशा सोपानच्या मोह मायेने तिचा आत्महत्तेचा मार्गही बंद केला होता. नाइलाजाने ती गावातच वेगळं घर करून निराधार व निराश्रिताचं जीवन कंठीत राहु लागली होती. मोलमजुरी करून जगत होती.

.....................................

दोन दिवस झाले संध्याकाळचे सहा वाजले होते. शेवंता घरीच होती. सोपान नुकताच शाळेतुन आला होता. तेव्हढयात कावळे मास्तर घरात शिरले. तसं शेवंताने सोपानच्या हाती वीसाची नोट देत त्याला दुधबॅग.साखर आणायला दुकानात पिटाळलं. फी भरायला दिलेल्या नोटेसारखीच ही नोट पण कोरीधक पाहुन तो आश्चर्यचकीत झाला वाटाने चालता चालता तो ती नोट न्याहाळून बारकाईने पाहु लागला अन त्या नोटेवर त्याला त्याने लिहीलेली 'सो. ना. 'ही अक्षरं दिसली अन फी म्हणुन दिलेली नोट अन ही नोट एकच असल्याची त्याची खात्री पटली. ही नोट पुन्हा आईजवळ आली कशी □ह्या एका प्रश्नानं त्याचं डोकं पोखरायला सुरूवात केली अन आपल्याच विचारात गुरफटलं. विचार करून करून त्याचा मेंदु बधीर झाला.

जसजसा तो विचार करू लागला तसतसं त्याला एकेक कोडं उलगडू लागलं. कावळे मास्तर ते आई .अन घर ते शाळा अन शाळा ते परत घर व्हाया कावळे मास्तर अशी एक प्रदक्षिणा पुर्ण करून पुढच्या

प्रदक्षिणेला ती नोट निघाली होती हे त्याने मनोमन ओळखलं होतं. आता त्या नोटेच्या परिक्रमेची पुनरावृत्ती होईल का ह्या विचाराने त्याच्या डोक्याचा भुगा झाला होता.

मास्तरविषयी त्यात्या मनात घृणा निर्माण झाली होती पण मास्तरवर त्याची नितांत श्रध्दा होती. चौथ्या इयत्त्येत शिकत असलेला सोपान आता वाढणाऱ्या वयाबरोबर बुध्दीनेही वाढला होता. स्वभावाने सालस असलेल्या सोपानच्या हाडीमाशी आज्ञाधारकपणा अन कष्टाळूपणा भिनला होता. वर्गात हुशार असलेल्या सोपानवर मास्तरचीही विशेष माया होती.

सोपानला मास्तरचा मनातल्या मनात खुप राग येई पण तो कधी मास्तरला चकार शब्दानही बोलला नव्हता. नुसता मनातल्या मनात धुमसत राही.

कावळे मास्तरच्या आता शेवंताच्या घरी वेळी अवेळी चकरा वाढल्या होत्या. गावात माणसं बाया दाबक्या आवाजात कुजबुजू लागले. चंपावाण्याचं घरी येणं. कधी कधी तलाठयाचा घरी तळ पडणं ह्यामागचं गुढ उकलु लागलं. गावतले लोक ‘रांड’ ‘रखेल’ ‘बाजिंदी’ अशा सुचेल ती संबोधनं शेवंताला बहाल करू लागले. गावातली पोरंटोरं बी सोपानला ‘बारबाप्या’ ‘बिनबापाचा’असं म्हणून हिणवु लागली. सारं गाव शेवंताच्या ‘बाजिंदेपणा’ बाबत कुचकूचत होतं. शहाणी. प्रतिष्ठीत माणसं ‘ह्या बाजिंदीने तर गावाची इज्जत वेशीला टांगली’ म्हणुन कुरकूरू लागली. बायाबापडया ‘ह्या गावभवानीचं तोंड पाहु नइ’ म्हणुन शंख करू लागल्या.

शेवंताला इज्जतीची चाड नव्हती. करून भागण्यासारखं नव्हतं. ती बेमुर्वतपणे वागत होती. तिच्या ‘बाजिंदेपणानं’ कळस गाठला होता. गाव तिला आता उघड उघड “बाजिंदी” म्हणुन संबोधु लागलं. सोपानला हे सारं सहन होईना गेलं. आईला काही बोलण्याइतपत त्याला साहस नव्हतं. मनातच तो

जळफळत होता. आईच्या बदफैली वागण्याची त्याला किळस वाटु लागली. लोकांच्या उपहासकारक टोचुन बोलण्यानं तो दुःखावला गेला.

अखेर एक दिवस रात्रीच्या अंधारात तो कोणाला काही न सांगता घर सोडून निघुन गेला. अंधारातच त्याचे पाय शहराच्या दिशेने गतीमान झाले त्याबरोबरच डोक्यात विचारांचं चक्र वेगाने फिरू लागलं. त्याच्या मनानं निराशावादी विचार झटकुन टाकले व ते 'नव्या आशावादा'कडे धावु लागलं. रात्रीच्या गडद अंधारातच्या गर्भातुनच 'उन्मेषी उषःकाळ'चा उदय होतो. 'जुन्याचा नाश होउन नव्याची निर्मिती होणं'हा सृष्टीचक्राचा नियमच आहे. मातीच्या गर्भात बीज रूजुन कुजून नष्ट होते अन त्यातुनच चैतन्यमय नव अंकुराचा जन्म होतो. पाण्याची वाफ होउन ते लोप पावल्यावरच धरतीला सुजलाम सुफलाम बनविणाऱ्या "अमृत धारांचा" वर्षाव करणाऱ्या पयोधरांची उत्पत्ती होते. कष्टांचे डोंगर चढुन पार केल्याशिवाय यशाची माला गळयात पडत नाही.

.........................

अशा अनेक प्रेरणादायी विचारांनी निराश झालेल्या सोपानला नवी आशादायक प्रेरकदृष्टी नियतीने प्रदान केली म्हणुनच 'अनाथाश्रमात दाखल झालेला सोपान नामेकर भगतवाडीचा शिक्षक होऊनच बाहेर पडला' अन् आज 'सत्कार समारंभ प्रसंगी' कावळे मास्तर शेजारी बसला होता.........

-----------x----------

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात छान वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि “वेळ” हा “घालवण्या”साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातून शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. मनावर होणारे परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विकत घेत नाही. कधी भॆट म्हणून, कधी घरात पडलेलं. कधी शॆजारून. कधी वाचनालयातून. त्याच्या हातात विनामूल्य पुस्तक पडतं आणि तो वाचतो/वाचते. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी

पेरावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहीतरी साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी उत्कृष्ट दर्जेदार भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन मराठी साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. विनामूल्य. हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे. ही नुसती सुरुवात आहे. लेखकांचं पाठबळ जर असंच मिळत राहिलं तर फ़ार मोठी झेप घ्यायची मनिषा आहे.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबपेजवर सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. ज्या दहा लोकांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान